# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर


क्र : मविनिआ/माअअ/59/2018/246 दि. 05.10.2018

प्रति,
श्री. दामोदर जुगलकिशोर पारिक,
नवजिवन कॉलनी, मु.पो.ता. वैजापूर,
जिल्हा - औरंगाबाद - 423701

विषय :- आपला दि. 11.09.2018 रोजीचा माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दि. 11.09.2018 रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, 2005 चे कलम 6 (1) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि. 17.09.2018 रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

| No. | Information Sought | Information Provided |
|---|---|---|
| 1 | औरंगाबाद परिमंडळासाठी ग्राहक गा-हाणी निवारण मंचावर एकाच व्यक्तीची चौथ्यांदा ग्राहक प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सदर नियुक्ती बेकायदा व कायद्यातील तरतूदींचा भंग करुन करण्यात आली असल्याने, सदर नियुक्ती रद्द करावी म्हणून मी दि. 18 जुन, 2018 रोजी एक तक्रारी अर्ज मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, कार्यालय मुंबई यांना पाठविला होता. जो 21 जुन, 2018 रोजी आपल्या कार्यालयास प्राप्त झाला होता.<br><br>सदर दि. 18 जुन, 2018 च्या तक्रारी अर्जावर आज पावेतो निर्णय न होण्याची कारणे मला मिळावी. | दि. 18.06.2018 च्या तक्रार अर्जानुसार मा. आयोगाने संबंधित कार्यालयाकडून स्वयंस्पष्ट अहवाल व इतर दस्ताऐवज आयोगाला सादर करण्याबाबत कळविले आहे. |
| 2 | आपले पत्र क्र. मविनिआ/माअअ/51/2018/0168 दि. 06.09.2018 मध्ये नमूद केल्याप्रमाणे मा. आयोगाने संबंधित आयोगाला सादर करण्याबाबत कळविले आहे. त्या पत्राची नक्कल प्रत मला देण्यात यावी. | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. संकीर्ण-2018/ प्र.क्र.70/ग्रा.सं.2, दि.20.06.2018 च्या पत्रांन्वये सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नांदेड आणि धर्मादाय आयुक्त, नवी दिल्ली यांना दि.20.06.2018 रोजीच्या पत्रांन्वये सदर माहिती तात्काळ मिळविण्याबाबत विनंती केली आहे (सदर दोन्ही पत्राची प्रत जोडलेली आहे). |

| | | |
|---|---|---|
| 3 | संबंधित कार्यालयाकडून अहवाल प्रलंबित असण्याची कारणे मला मिळावीत. | आयोगाचे पत्र क्र. मविनिआ / ग्रासंसं / 2018/ 0181 व 182 दि. 07.09.2018 कार्यकारी संचालक (वाणिज्य), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, बांद्रा (पू), मुंबई आणि प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई या कार्यालयाना पाठविलेल्या पत्रांची प्रत सोबत जोडलेली आहे. |
| 4 | मा. आयोगाने कोणकोणत्या कार्यालयांकडून व विभागांकडून या प्रकरणी माहिती व दस्ताऐवज मागविले आहेत. त्या संदर्भात त्या त्या कार्यालयांना किंवा विभागांना झालेल्या पत्रव्यवहारांच्या नकला मला देण्यात याव्यात. | सदरहू अहवाल या कार्यालयाकडे अद्यापही अप्राप्त आहे. संबंधित अहवाल व माहिती प्राप्त झाल्यानंतर आयोगाकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल. |

आयोगाच्या कार्यालयातील प्रथम अपीलीय अधिकारी श्री. अनिलकुमार उके, उपसंचालक (विधी), महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई हे आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 चे कलम १९ (१) अन्वये सदर पत्र प्राप्त झाल्यापासून 30 दिवसाच्या आत अपीलीय अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

आपला विश्वासू,

(प्रदिप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी

325/C

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

क्र. मविनिआ/ग्रासंसं/२०१८/962 दि. ०७.०९.२०१८

कार्यकारी संचालक (वाणिज्य),
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
प्लोट क्र. जी - ९, प्रकाशगड,
प्रा. अनंत काणेकर मार्ग,
बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१

विषय - औरंगाबाद, पुणे व बारामती येथील वीज ग्राहक गाऱ्हाणी निवारण मंचावरील अशासकीय सदस्य नियुक्ती बेकायदा असुन त्वरित रद्द करणेबाबत.

संदर्भ - (१) श्री. रमेश टाकळकर, अध्यक्ष, अखिल भारतीय ग्राहक पंचायत, जिल्हा पुणे यांचे दि. २१.०३.२०१८ रोजीचे पत्र.

(२) आयोगाचे पत्र क्र. मविनिआ/ग्रासंसं/२०१८/०४४५ दि. ०६ एप्रिल, २०१८.
(३) आयोगाचे पत्र क्र. मविनिआ/ग्रासंसं/२०१८/०००४ दि. ०६ जून, २०१८.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. २ आणि ३ अन्वये ग्राहक गा-हाणी निवारण मंच (CGRF) औरंगाबाद, पुणे व बारामती या ३ परिमंडळातील सदस्यांच्या (ग्राहक संरक्षण संस्था) नेमणूकीबाबत श्री. रमेश टाकळकर, अध्यक्ष, अखिल भारतीय ग्राहक पंचायत, जिल्हा पुणे यांचा दि. २१.०३.२०१८ रोजीचा तक्रार अर्ज सोबत जोडून आपल्या स्तरावर स्वतंत्रपणे श्री. रमेश टाकळकर यांच्या तक्रारीची शहानिशा करुन स्वयंस्पष्ट अहवाल मा. आयोगाकडे तातडीने सादर करणेबाबत निर्देश दिले आहेत. परंतु, आज अखेर आपल्या कार्यालयातून तक्रारीबाबत स्वयं स्पष्ट अहवाल आयोगास प्राप्त झालेला नाही.

तरी उपरोक्त संदर्भीय प्रकरणी प्राधान्याने कार्यवाही करुन आवश्यक प्रस्ताव/अहवाल आयोगास त्वरीत सादर करावा, ही विनंती.

आपली विश्वासू,
आरती बोंढारे
(आरती बोंढारे)
उपसंचालक (प्रशासन व वित्त)

सोबत:
(१) श्री. रमेश टाकळकर, अध्यक्ष, अखिल भारतीय ग्राहक पंचायत, जिल्हा पुणे यांचे पत्र.
(२) आयोगाचे पत्र क्र. मविनिआ/ग्रासंसं/२०१८/०४४५ दि. ०६ एप्रिल, २०१८.
(३) आयोगाचे पत्र क्र. मविनिआ/ग्रासंसं/२०१८/०००४ दि. ०६ जून, २०१८.

323/७

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

मविनिआ/प्रशा/ग्रा.सं.सं. /२०१८/०१८।                                                                                   दि.०७.०९.२०१८

विषय: ग्राहक पंचायत महाराष्ट्र, नांदेड आणि अखिल भारतीय ग्राहक पंचायत, नवी दिल्ली या दोन्ही संस्थेच्या नोंदणीबाबत.

संदर्भ:- १.आपल्या विभागाचे क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.७०/ग्रा.सं. २, दि.२०.०६.२०१८ रोजीचे पत्र.
२. आयोगाच्या कार्यालयाचे दि. १८.०६.२०१८ रोजीचे पत्र

प्रिय श्री पाठक,

उपरोक्त संदर्भाधीन पत्र क्र. २ अन्वये ग्राहक पंचायत महाराष्ट्र, नांदेड आणि अखिल भारतीय ग्राहक पंचायत, नवी दिल्ली या दोन्ही संस्था सद्यस्थितीत आज अखेर नोंदणीकृत/अधिकृत आहे का, तसेच या संस्थांना शासन मान्यता आहे किंवा कसे, याबाबत आपणांकडे विचारणा करण्यात आली होती. संदर्भाधीन पत्र क्र. १ अन्वये आपण सदर माहिती मिळण्याबाबत ग्राहक पंचायत महाराष्ट्र आणि अखिल भारतीय ग्राहक पंचायत, नवी दिल्ली यांना कळविले होते परंतु सदर माहिती अद्यापही अप्राप्त आहे. तरी, याबाबतची माहिती आयोगाच्या कार्यालयास त्वरीत कळवावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(मुकेश खुल्लर),
सदस्य, मविनिआ

प्रति,

श्री. महेश पाठक,
प्रधान सचिव,
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
रुम नं. २२२, दुसरा मजला,
अनेक्स बिल्डींग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.

O/C
१०-०९-१८
निर्गमक
प्रधान सचिवांचे कार्यालय
नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Colaba, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in **Website :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in

D. V. H. Boawake 317/9

2/6/18
2332

क्र. संकिर्ण -२०१८/ प्र.क्र. ७०/ ग्रा. सं. २
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, विस्तार, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- २० जून, २०१८

प्रति,
सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
प्लॉट नं. ३२ व ३३, महावीर सोसायटी,
शिवाजी नगर, नांदेड - ४३१६०५

**विषय** :- ग्राहक पंचायत महाराष्ट्र या संस्थेचा नोंदणीबाबत.

महोदय,

सोबत ग्राहक पंचायत महाराष्ट्र यांचे नोंदणी प्रमाणपत्र व नोंदणीचे प्रमाणपत्र ची छायाप्रत पाठवित आहे.

सदर संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम, १९५० ( सन १९५० चा मुंबइ्र अधिनियम क्र. २९ ) अन्वये, नांदेड, विभाग नांदेड येथील सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालयात योग्य रितीने नोंदविण्यात आलेली आहे व त्याचा सार्वजनिक विश्वस्त संस्थेचा नोंदणी पुस्तकेतील क्र. एफ १६४२० असून, तसे नोंदणी प्रमाणपत्र दिनांक १४.५.२०१० रोजी डॉ. लाड यांना दिले आहे. याबाबत खालील माहिती या कार्यालयास तात्काळ पाठवावी, ही विनंती.

१) सदर संस्था सद्यस्थितीत आज अखेर नोंदणीकृत / अधिकृत आहे का, तसेच ही संस्था शासन मान्यता आहे किंवा कसे ?

आपला,

( सु. ज्ञा. रेडेकर )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीसाठी :-
सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई

D. D. H. Bodhaze
3/5/19

No. MISE-2018/CR-70/GS-2
Food, Civil Supply & Consumer Protection
Department,
Hutatma Rajguru Chawk, Madam Cama Ro
Mantralaya, Mumbai - 032.
Dt: 20th June, 2018

22/6/18
2333

To,
Charity Commissioner,
13, Jai Laxmi Apartment,
IP Extension, Plot 59,
Patparganj, New Delhi - 110 092.

**Subject: - Regarding Registration of Akhil Bhartiya Grahak Pachayat.**

Respected Sir,

The Certificate of Registration of Akhil Bhartiya Grahak Panchayat is enclosed herewith.

Akhil Bhartiya Grahak Panchayat is registered under Societies Registration Act, XX 1 of 1860 and the certificate has given on 3rd April, 1978 at New Delhi, bearing the number of 9194 in New Delhi. The following information regarding this organization is required.

**"Is this organization's registration is continuing as on today, Is it authorized and government approved".**

Therefore you are requested to communicate this information as early as possible to this office.

Yours Faithfully,

(Suresh Redekar)
Under Secretary, Government of Maharashtra

Copy to
Secretary, Maharashtra Electricity Regulatory Commission, Mumbai.